मराठी माणसाचा मानदंड
# राजदंड
। पश्चिम महाराष्ट्र ।
www.rajdand.com
follow us : /rajdandlive

RNI Regd No.72105/99 ✻ वर्ष २५ ✻ अंक २७९ ✻ सातारा ✻ सातारा ✻ शुक्रवार ✻ दि. २१ जून २०२४ ✻ पाने ८ ✻ किंमत ५ रू/

# मोदींशी माझं वैयक्तीक भांडण नाही; मात्र त्यांच्या धोरणाला आमचा विरोध : शरद पवार

## लोणी भापकर येथे जनसंवाद मेळाव्याचे आयोजन



**बारामती :** पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी लोकसभा निवडणुकीमध्ये महाराष्ट्रात १८ ठिकाणी सभा घेतल्या, यातील नऊ ठिकाणी केलेल्या भाषणांमध्ये त्यांनी माझ्यावर टीका केली. वास्तविक पाहता त्यांच्याशी माझा वैयक्तिक वाद नाही, त्यांनी माझा कोरला नाही; मात्र त्यांनी घेतलेल्या शेतकरी विरोधी धोरणाला आपला विरोध असून शेतकऱ्यांसह महाराष्ट्रातील सर्व घटकांचे प्रश्न सोडवण्यासाठी राज्यातील सत्ता हातात घ्यायची आहे, असे प्रतिपादन राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे अध्यक्ष शरद पवार यांनी केले.

लोणी भापकर (ता. बारामती) येथे आयोजित जनसंवाद मिळाव्यात ते बोलत होते. यावेळी सदाशिव सातव, युगेंद्र पवार यांच्यासह इतर मान्यवर व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी शरद पवार म्हणाले, गेल्या काही वर्षांपूर्वी नरेंद्र मोदी माळेगाव मधील एका संस्थेच्या कार्यक्रमासाठी आल्यानंतर त्यांनी माझ्या बोटाला धरून राजकारणात आलो असल्याचा उल्लेख केला होता, मात्र त्यांचे हे भाष्य खरे नव्हते. माझे त्यांच्याशी वैयक्तिक भांडण नाही. मात्र त्यांनी शेतकरी

**मोरगाव येथील जनसंवाद मेळाव्यात शरद पवार यांना उपस्थितांनी मोरगाव मध्ये लॉजमध्ये सुरू असलेल्या गैरप्रकार संदर्भात चिठ्ठ्या दिल्या. या संदर्भात बोलताना शरद पवार यांनी अष्टविनायकापैकी एक असलेल्या मोरगाव मध्ये लॉजमध्ये गैरप्रकार चालत असतील तर ही गंभीर बाब आहे. अशाप्रकारे लॉज चालवणारे काही राजकीय पदाधिकारी आहेत, हे दुर्दैवी आहे, अशी खंत त्यांनी बोलताना व्यक्त केली.**

हिताविरोधी भूमिका घेतली, त्यांच्या या धोरणाला आपला विरोध आहे. राज्यातील साखर कारखान्यांनी साखरेचे जादा उत्पादन केल्यानंतर अतिरिक्त साखर परदेशात पाठवायचे असते. मात्र पंतप्रधान मोदींनी साखरेवर निर्यात बंदी घातली. साखर कारखान्यांनी मळी पासून इथेनॉल निर्मिती करण्यासाठी प्रत्येकी ८० कोटी खर्च करून हे प्रकल्प सुरू केले. इथेनॉल निर्मितीमुळे शेतकऱ्यांना दोन पैसे जादा मिळत होते, मात्र मोदींनी इथेनॉल निर्मितीला बंदी घातली. त्यांची ही धोरणे चुकीची आहेत, शेतकऱ्यांच्या हिताची नाहीत. याबाबत आम्ही लोकसभा व राज्यसभेत त्यांच्याशी भांडतो, त्यावेळी ते आम्ही खाणाऱ्यांचा विचार करतो, असे सांगतात. याबाबत आमची तक्रार नाही, पण पिकविणाऱ्याने पिकवले तर खाणारा काय खाणार? याचा विचार केला पाहिजे. खाणारा उध्वस्त झाला तर पिकवणारा देखील उध्वस्त झाल्याशिवाय राहणार नाही, हे पंतप्रधान मोदींना पटत नाही, म्हणून आमचा त्यांना विरोध आहे; बाकी आमचे भांडण नाही, कुस्ती देखील पवार यांनी यावेळी जोडली.

लोकसभा निवडणुकीत देशाचा पंतप्रधान राज्यात प्रचारासाठी येतो, तो एकाच माणसाची आठवण ठेवतो, आठवण होतात म्हणजे चांगली गोष्ट आहे, असे सांगत पवार म्हणाले, काही लोक असे असतात की, स्वभाव नाव ठेवायची, करायची, त्यांना एवढी सवय असते की ते झोपेत देखील चावळतात, तेच काम मोदींनी लोकसभा निवडणुकीत केल्याचा टोमणा पवार यांनी यावेळी मारून ते म्हणाले, त्यांच्याकडून स्तुती करायचे असेल तर त्यांच्या सत्ता काढून घ्यायचे आहे.

राज्याची सत्ता हा-तात दिल्यानंतर बारामती तालुक्यातील जिरायती भागा-तील पुरंदर व जनाई शिरसाई या दोन उपसा सिंचन योजना व्यवस्थितपणे सुरू ठेवून शेतकऱ्यांना वेळेवर पाणी दिले जाईल. दुर्दैवाने ज्यांच्या हातात सत्ता आहे,

त्यांनी ही योजना चालू ठेवण्यासाठी अनेक गोष्टी करण्याची आवश्यकता असूनही त्या केल्या नसल्याची खंत व्यक्त करत उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्यावर यांनी अप्रत्यक्ष टीका केली.

# झेडपी कामे वाटपात आमदारांच्या शिफारशीची गरज नाही

## खा.प्रणिती शिंदेनी अधिकाऱ्यांना सुनवलं

**सोलापूर :** गाव पातळीवरील झेडपीच्या विकास निधी वाटपाला आमदारांच्या शिफारशींची गरज नाही. असे स्पष्ट मत मांडत खासदार प्रणिती शिंदे यांनी अधिकाऱ्यांना सुनवले आहे. गुरुवारी खा. प्रणिती शिंदे यांनी झेडपीची आढावा बैठक घेतली. बैठकी दरम्यान , दलित वस्ती , शाळा दुरूस्ती, जलजीवन , पाणीपुरवठा, जनसुविधा , नागरी सुविधा , अथवा सेस फंड निधी वाटपासाठी आमदारांची शिफारशीची गरज नाही. ग्रामपंचायतीच्या ठरावा नुसार लोकसंख्या निहाय निधी वाटप करण्यात यावा. आमदारांची शिफारस बंधनकारक असल्याचे भासविल्यामूळे अनेक गावे विकासा पासून वंचीत राहत आहेत. आमदारांच्या शिफारस शिवाय गावाला निधी मिळणार नाही असा शासन निर्णय आहे का ? असा सवाल खा. प्रणिती शिंदे यांनी उपस्थित करताचं अधिका-यांची भंबेरी उडाली. तात्कालीन पालकमंत्री राधाकृष्ण विखेपाटील यांनी आमदारांच्या शिफारशी शिवाय निधी देऊ नका असे झेडपी अधिकाऱ्याना सुचीत केले होते. तीचं रिघ विद्यमान पालकमंत्री चंद्रकांत पाटील यांनी ओढली . खा. शिंदे यांनी दिलेल्या सुचनाचे पालन होणार का हे पाहणे आता औचुक्याचे ठरणार आहे.



**१८९ कामांचे बिले निघणार**

**जलजीवन मिशन पाणी पुरवठा विभागाच्या १८९ कामांचे बिले आठवडा भरात ठेकेदारांना मिळणार आहेत. १८९ कामावरून मोठा गदारोळ उडाला होता. या कामांवर चौकशी समिती नेमून चौकशी करण्यात आली होती. हा मुद्दा उपस्थित होताचं सीईओ मनीषा आव्हाळे यांनी आठ दिवसात बिले काढण्याचे आश्वासन दिल्याचे माहीती सुरेश हसापुरे यांनी दिली.**

आढावा बैठक प्रसंगी माजी गृहराज्यमंत्री सिध्दाराम म्हेत्रे, माजी आमदार दिलीप माने , सुरेश हसापुरे , यांच्यासह सीईओ मनीषा आव्हाळे , एडीशनल सीईओ संदीप कोहीनकर , विभागप्रमुख उपस्थित होते.

# दिल्लीचे मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांना जामीन मंजूर; ईडीला न्यायालयाकडून झटका



**दिल्ली :** कथित मद्य घोटाळ्याप्रकरणात ईडीकडून दिल्लीचे मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांच्यावर मनी लाँडरिंगचा गुन्हा दाखल करून अटक करण्यात आले होते. गुरुवारी (दि. २० जून) या प्रकरणात दिल्लीच्या राऊस एव्हेन्यू न्यायालयाने अरविंद केजरीवाल यांचा जामीन मंजूर केला. यामुळे ईडीला मोठा झटका मिळाल्याचे दिसते. न्यायाधीश न्याय बिंदू यांनी जामीन मंजूर केल्यानंतर ईडीकडून कायदेशीर बाजू मांडण्यासाठी ४८ तासांचा वेळ मागितला गेला. मात्र न्यायाधीशांनी ईडीची मागणी फेटाळून लावत जामीन देण्याचा निर्णय दिला.

आम आदमी पक्षाचे संयोजक अरविंद केजरीवाल यांना एक लाख रुपयांच्या जातमुचलक्यावर जामीन मंजूर झाला आहे. त्यामुळे ते शुक्रवारी तुरुंगातून बाहेर येऊ शकतात. दिल्ली कथित मद्य घोटाळ्याप्रकरणी जामीन मिळालेले अरविंद केजरीवाल हे खासदार संजय सिंह यांच्यानंतर दुसरे आप पक्षाचे नेते आहेत. मात्र दिल्लीचे माजी उपमुख्यमंत्री मनीष सिसोदिया हे याच प्रकरणात अद्याप तिहार तुरुंगात आहेत.

अरविंद केजरीवाल यांनी राऊस एव्हेन्यू न्यायालयात अलीकडेच जामिनासाठी दोन याचिका दाखल केल्या होत्या. त्यापैकी एक अंतरिम जामिनासाठी आणि एक जामिनासाठी याचिका दाखल केली होती. यापैकी ५ जून रोजी अंतरीम जामिनाची याचिका फेटाळण्यात आली होती.

गुरुवारी न्यायालयात सुनावणी सुरू असताना अतिरिक्त महाधिवक्ता एसव्ही राजू यांनी ईडीतर्फे बाजू मांडली. त्यांनी जामीन देण्यास विरोध केला. आम आदमी पक्षाने गोव्याच्या विधानसभा निवडणुकीत जे पैसे खर्च केले, ते हवालामार्फत पक्षाला प्राप्त झाले होते. यामध्ये अरविंद केजरीवाल यांच्या विरोधात थेट पुरावे असल्याचा दावा ईडीकडून करण्यात आला.

मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांना जामीन मंजूर झाल्यानंतर आप कार्यकर्त्यांनी फटाके उडवून आनंद साजरा केला. केजरीवाल यांच्या सुटकेमुळे लोकशाहीला बळकटी मिळाली आहे, अशी प्रतिक्रिया खासदार संजय सिंह यांनी दिली.

ईडीकडून २१ मार्च रोजी अरविंद केजरीवाल यांना अटक करण्यात आली होती. लोकसभा निवडणुकीच्या एक महिना आधा ही अटक झाल्यामुळे आम आदमी पक्षाकडून केंद्र सरकारवर आरोप करण्यात आला होता. लोकसभा निवडणुकीत प्रचारासाठी मे महिन्यात केजरीवाल यांना अंतरिम जामीनही मंजूर करण्यात आला होता. त्यानंतर सातव्या टप्प्याचे मतदान होताच २ जून रोजी केजरीवाल पुन्हा तुरुंगात गेले होते.

# मुस्लिम मतदारांनी साथ सोडल्याने आपला पराभव : प्रकाश आंबेडकर



**आमच्या आरक्षणात वाटेकरी नको: हाके**

**यावेळी पत्रकारांशी बोलताना हाके म्हणाले की, मराठा समाजाला आरक्षण देण्यास आमची कोणतीही हरकत नाही. मात्र, आम्हाला आमच्या आरक्षणात वाटेकरी नको आहे. सरकारने मराठा समाजाला स्वतंत्र आरक्षण दिले तरी त्याला आमची हरकत नाही. मराठा समाजाला सगे सोयऱ्यांची व्याख्या करायची असेल तर आरक्षणात वर्गीकरण असावे. अन्यथा त्या आरक्षणाला आमचा विरोध असेल, असेही हाके म्हणाले.**

**जालना :** अकोला लोकसभा मतदारसंघात मुस्लिम समाजाकडून आपल्याला अपेक्षित मतदान झाले नाही. मुस्लिम मते १०० टक्के काँग्रेसकडे वळली. त्यामुळे आपला पराभव झाला, असा दावा वंचित बहुजन आघाडीचे प्रमुख प्रकाश आंबेडकर यांनी केला.

'आरक्षण बचाव' या मागणीसाठी इतर मागासवर्गीय समाजाचे नेते लक्ष्मण हाके आणि नवनाथ वाघमारे यांनी अंतरवाली सराटीच्या वेशीवर असलेल्या वडीगोद्री या गावी उपोषण करीत आहेत. आंबेडकर यांनी उपोषणस्थळी आंदोलकांची भेट घेतली. यावेळी त्यांनी हाके आणि वाघमारे यांना पाणी पिऊन उपोषण सुरू ठेवण्याचा सल्ला दिला. त्याचा मान ठेवून दोन्ही उपोषणकर्त्यांनी पाणी प्राशन केले. माजी पंतप्रधान व्ही पी सिंग यांनी पाणीही न घेता उपोषण केल्यामुळे त्यांची किडनी खराब झाल्याचे उदाहरण त्यांनी उपोषणकर्त्यांना दिले. यावेळी आंबेडकर यांनी उपस्थित पत्रकारांशी संवाद साधला. त्यांनी अकोला मतदारसंघात झालेल्या आपल्या पराभवाचे विश्लेषण माध्यमांसमोर मांडले. या मतदारसंघात इतर मागासवर्गीय, मागासवर्गीय यांच्याबरोबरच मुस्लिम मतदार आपल्या पाठीशी राहिला आहे. मात्र, या निवडणुकीत १०० टक्के मुस्लिम मतदार पूर्णपणे काँग्रेसकडे वळले. त्यामुळे मागासवर्गीय आणि इतर मागासवर्गीयांची मते मिळूनही आपला पराभव झाला. काही प्रमाणात मुस्लिम मते आपल्याकडे वळली असती तरीही आपला विजय झाला असता, असा दावाही आंबेडकर यांनी केला.

# 'विद्यार्थ्यांचे भवितव्य धोक्यात

## संसदेत मुद्दा मांडणार': NEET वादावर राहुल गांधी

**दिल्ली :** काँग्रेसने बुधवारी NEET UG वादावर देशव्यापी आंदोलनाची घोषणा केली होती आणि शुक्रवारी विद्यार्थ्यांना न्याय मिळावा या मागणीसाठी मोठ्या प्रमाणात निदर्शने करण्याचे निर्देश राज्य युनिट्सना दिले होते.

राष्ट्रीय पात्रता-सह-प्रवेश परीक्षेतील अनियमिततेच्या आरोपांदरम्यान, काँग्रेसचे ज्येष्ठ नेते राहुल गांधी यांनी गुरुवारी सांगितले की, तरुणांचे भविष्य धोक्यात आले आहे आणि विरोधी पक्ष हा मुद्दा संसदेत उपस्थित करतील.

दिल्ली AICC मुख्यालयात पत्रकार परिषदेला संबोधित करताना, रायबरेलीचे खासदार म्हणाले, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी रशिया-युक्रेन युद्ध थांबवले असा दावा केला जात होता, पण भारतातील पेपरफुटी थांबवू शकले नाहीत, किंवा उलट कसे? त्यांना थांबवायचे नाही.



पेपर लीकला देशविरोधी कृती असे संबोधून गांधी म्हणाले, पेपर फुटण्यामागील कारण म्हणजे शिक्षण व्यवस्थेवर भाजपच्या मूळ संघटनेने (आरएसएस) कब्जा केला आहे. जोपर्यंत हा प्रकार पूर्ववत होत नाही तोपर्यंत पेपर फुटण्याचे प्रकार सुरूच राहणार आहेत. पंतप्रधान मोदींनी हे कॅप्चर करण्याची सोय केली आहे.

केंद्रीय शिक्षण मंत्री धर्मेंद्र प्रधान यांनी परीक्षा आयोजित करणाऱ्या नॅशनल टेस्टिंग एजन्सीला क्लीन चिट दिल्याबद्दल गांधी म्हणाले, या प्रकरणांमध्ये त्यांची (केंद्र सरकारची) विश्वासार्हता नाही. त्यांनी क्लीन चिट दिली तर त्याचा अर्थ काही नाही, त्यांची विश्वासार्हता शून्य आहे. प्रत्येकाला माहित आहे की गळतीची केंद्रे मध्य प्रदेश, गुजरात आणि उत्तर प्रदेश आहेत.

शिक्षण व्यवस्था एका संघटनेने काबीज केली आहे. प्रत्येक पदावर त्यांनी आपली माणसे बसवली. तो उलट करावा लागेल. पेपरफुटीनंतर कारवाई करणे ही एक गोष्ट आहे, पण पेपरफुटीपूर्वी ज्या यंत्रणा होत्या, विद्यापीठाच्या परीक्षांचे नियम, त्यांचे पुनर्मूल्यांकन, अभ्यास आणि पुनर्रचना करावी लागेल. या दोन गोष्टी आम्ही आमच्या जाहीरनाम्यात लिहिल्या आहेत आणि विरोधक सरकारवर दबाव आणून या दोन गोष्टी पूर्ण करण्याचा प्रयत्न करतील, असे ते म्हणाले.

UGC-NET परीक्षा रद्द केल्याचा संदर्भ देत गांधी म्हणाले, आता लोकांना हे स्पष्ट झाले आहे की आपण एका आपत्तीवर बसलो आहोत आणि आपले सरकार अपंग आहे. हे एक गंभीर राष्ट्रीय संकट आहे. मला (सरकारकडून) प्रतिसाद देण्याची क्षमताही दिसत नाही.

चौकशी सुरू आहे, एक (परीक्षा) रद्द करण्यात आली आहे; दुसरा रद्द केला जाईल की नाही हे आम्हाला माहित नाही. पण, या सगळ्याला कोणीतरी जबाबदार असून त्यांना अटक करून त्यांच्यावर कारवाई झाली पाहिजे, असे गांधी म्हणाले.

काँग्रेसने बुधवारी NEET-UG वादावर देशव्यापी आंदोलनाची घोषणा केली होती आणि शुक्रवारी विद्यार्थ्यांना न्याय मिळावा या मागणीसाठी मोठ्या प्रमाणात निदर्शने करण्याचे निर्देश राज्य युनिट्सना दिले होते.

निषेधाचे आवाहन करताना, काँग्रेसचे सरचिटणीस (संघटना) के सी वेणुगोपाल म्हणाले होते, नीट परीक्षेतील या प्रचंड भ्रष्टाचार आणि अनियमितता आणि एनडीए सरकारच्या हताश निष्क्रियता आणि मौन विरोधात, सर्व प्रदेश काँग्रेस समित्यांना राज्यात मोठ्या प्रमाणात निदर्शने करण्याची विनंती करण्यात आली आहे. विद्यार्थ्यांना न्याय मिळावा या मागणीसाठी शुक्रवार, २१ जून २०२४ रोजी मुख्यालय. या निदर्शनात वरिष्ठ नेते आणि पक्षाच्या कार्यकर्त्यांचा समावेश असावा.

## संपादकीय

# प्रियंका मैदानात

काँग्रेसचे नेते राहुल गांधी दोन लोकसभा मतदारसंघातून निवडून आल्यामुळे नियमानुसार ते वायनाड लोकसभा मतदारसंघातील सदस्यत्वाचा राजीनामा देणार आहेत. ही घटना एका वेगळ्या राजकीय समीकरणाला गती देणारी आहे. वायनाड लोकसभा मतदारसंघातून प्रियंका गांधी आता निवडणुकीच्या मैदानात उतरणार आहेत. केरळमधील राजकीय वातावरण पाहता त्या निवडून येण्यात कोणतीही अडचण नाही. काँग्रेसच्या महासचिव असलेल्या आणि यापूर्वी संकटमोचक म्हणून काम केलेल्या प्रियंका आता प्रत्यक्षात संसदीय राजकारणात येत आहेत. गांधी-नेहरू परिवारातील संसदीय राजकारणात येणाऱ्या त्या दहाव्या सदस्य आहेत. काँग्रेस दक्षिण भारतात प्रबळ होती. उत्तर भारतात तिचे अस्तित्त्व फार नव्हते. आता उत्तर प्रदेशात समाजवादी पक्ष आणि काँग्रेस एकत्र आल्याने या वेळी जागा वाढल्या आहेत. रायबरेलीची जागा ठेवून वायनाडचा राजीनामा द्यायचा आणि तिथून प्रियंका यांना निवडून आणून दक्षिण आणि उत्तर भारतात काँग्रेसचा पाया अधिक मजबूत करायचा, असा हेतू त्यामागे आहे. वायनाडची जागा सोडून देशातील सर्वात मोठे राजकीय राज्य आणि गांधी घराण्याचा बालेकिल्ला असलेल्या उत्तर प्रदेशासह हिंदी भाषक राज्य आपलेसे करण्याचा राहुल यांचा प्रयत्मन आहे. गांधी घराण्याला माहीत आहे, की उत्तर प्रदेशातील आपली गमावलेली राजकीय पोकळी भरून काढण्यासाठी यापेक्षा दुसरी चांगली संधी नाही. लोकसभा निवडणुकीत 'इंडिया' आघाडीने उत्तर प्रदेशात देशातील सर्वोत्तम कामगिरी केली.राहुल यांनी जरी आता वायनाडमधून राजीनामा देण्याची घोषणा केली असली, तरी हा निर्णय दहा दिवसांपूर्वी घेण्यात आला होता. सोमवारची बैठक ही निव्वळ औपचारिकता होती. बैठकीत बहुतांश नेत्यांनी सांगितले, की राहुल यांनी दक्षिण भारतात काँग्रेस मोठ्या प्रमाणात मजबूत केली आहे. आता उत्तर भारताची म्हणजेच हिंदी पट्टा मजबूत करण्याची वेळ आहे. काँग्रेसला देशात एकहाती सरकार बनवायचे असेल, तर त्यांना हिंदी हृदयभूमी जिंकावी लागेल. त्यामुळे राहुल उत्तर भारताचे नेतृत्व करतील, तर प्रियंका दक्षिण भारताचे नेतृत्व करतील, असा निर्णय पक्षाने घेतला. प्रियंका दक्षिणेत गेल्याने काँग्रेसविषयी लोकांमध्ये नाराजी राहणार नाही. याशिवाय काँग्रेसची पकडही अबाधित राहणार आहे.

गांधी घराण्याच्या आत्तापर्यंतच्या राजकारणावर नजर टाकली, तर पक्षप्रमुखांनी नेहमीच अमेठी किंवा रायबरेलीतून देशाचे राजकारण चालवले आहे. या दोन्ही जागा कुटुंबासाठी लकी मानल्या जातात. राहुल दोन ठिकाणांहून निवडून आल्याने कोणत्या जागेचा राजीनामा द्यायचा याबाबत त्यांच्या मनात द्वंद्व निर्माण झाले असेल;परंतु पक्षाच्या सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, सोनिया यांनी राहुल यांना वायनाडपेक्षा रायबरेली का महत्त्वाची आहे, हे समजावून सांगितले. उत्तर प्रदेशात लोकसभेच्या ऐंशी जागा असून या राज्यात काँग्रेसचा पाया मजबूत करायचा असेल,तर रायबरेलीची खासदारकी महत्त्वाची आहे, हे त्यांचे म्हणे त्यांना पटले. मोरारजी देसाई, नरेंद्र मोदी, एच. डी. देवेगौडा असे काही मोजके पंतप्रधान वगळले, तर बहुतांश पंतप्रधान उत्तर प्रदेशातील होते. मोदी गुजरातचे असले, तरी ते वाराणसीतून निवडून येतात. ही पार्श्वभूमी एकदा लक्षात घेतली, तर राहुल यांनी वायनाडचा राजीनामा का दिला, हे लक्षात येईल. सोनिया यांनी रायबरेलीच्या जनतेला 'मी माझा मुलगा तुमच्याकडे सोपवत आहे' असे म्हटले होते. त्यांचे ते भावनिक आवाहन परिणामकारक ठरले.

राहुल यांना रायबरेलीमध्ये वायनाडपेक्षा मोठा विजय मिळाला. अशा परिस्थितीत रायबरेली सोडल्यास उत्तर प्रदेशात चुकीचा संदेश गेला असता. एवढेच नाही, तर गांधी घराण्याच्या प्रमुखाने नेहमीच उत्तर प्रदेशातून राजकारण केले. वडील राजीव गांधी अमेठीतून, तर आजोबा जवाहरलाल नेहरू अलाहाबादमधून निवडणूक लढवत होते. रायबरेली ही त्यांची आई सोनिया, आजी इंदिरा गांधी आणि आजोबा फिरोज गांधी यांची जागा आहे. हिंदी पट्टा आणि देशाच्या सत्तेचा मार्ग उत्तर प्रदेशातून जातो. उत्तर भारतातील राज्यांमध्ये लोकसभेच्या ५४३ पैकी ३५० जागा हिंदी भाषिक बहुसंख्य राज्यांमधून येतात. येथे २०१९ मध्ये भाजपला १७० हून अधिक जागा मिळाल्या होत्या आणि भाजपने एकहाती सरकार स्थापन केले होते. काँग्रेसचाही असाच विचार आहे, की केंद्रात एकहाती सरकार बनवायचे असेल, तर हिंदी भाषिक राज्यांमध्ये आणि विशेषत: उत्तर प्रदेशात पक्ष मजबूत बनवावा लागेल, कारण आघाडीच्या जोरावर जास्त काळ ते सत्तेवर राहू शकत नाही.उत्तर प्रदेशात या वेळी काँग्रेसला ९.४ टक्के मते मिळाली आहेत. काँग्रेससाठी ही संजीवनी आहे. २०१९ मध्ये काँग्रेसला फक्त ६.३६ टक्के मते आणि एक जागा मिळाली. २०२२ च्या विधानसभा निवडणुकीत २.३३ टक्के मते आणि दोन जागा मिळाल्या.

विरोधी पक्षनेता उत्तर प्रदेशचा असावा, अशी काँग्रेसजणांची इच्छा आहे. राहुल यांना संसदेत विरोधी पक्षनेते व्हावे लागेल, अन्यथा त्यांच्यावर शिस्तभंगाची कारवाई करू, असे खर्गे यांनी म्हटले होते. याचा अर्थ राहुल विरोधी पक्षनेते होणार हे निश्चित मानले जात आहे. रायबरेलीची जागा कायम ठेवण्यामागील काँग्रेसची एक कल्पना अशी आहे, की विरोधी पक्षनेताही पंतप्रधान ज्या राज्यातून येईल त्या राज्याचाच असेल. यामुळे राहुल यांना राष्ट्रीय मीडिया आणि लोकांमध्ये राहण्याची अधिक संधी मिळेल. राहुल उत्तर प्रदेशात अधिक सक्रिय झाले, तर ते मोदी यांच्यांशी अधिक स्पर्धा करू शकतील. उत्तर प्रदेशचे प्रश्न राहुल सभागृहात मांडू शकतील. यामुळे उत्तर प्रदेशात काँग्रेसचा जनसंपर्क आणखी वाढेल. तसेच हिंदी भाषिक राज्यांमध्ये काँग्रेस मजबूत होईल. काँग्रेसचे कार्यकर्ते पुन्हा एकदा नव्या ऊर्जेने आणि उत्साहाने जनतेत येतील. इतकेच नाही, तर उत्तर प्रदेश आणि इतर राज्यांमध्ये काँग्रेस भाजपला पर्याय बनू शकेल. प्रियंक समर्थक काहींनी राहुल यांनी वायनाड सोडू नये आणि प्रियंकांनी रायबरेलीतून पोटनिवडणूक लढवावी अशी इच्छा व्यक्त केली होती; परंतु प्रियंकांनी ते मान्य केले नाही. नामांकनाच्या एक दिवस आधी राहुल रायबरेलीतून निवडणूक लढवणार, असे गांधी परिवाराने ठरवले होते. प्रियंका आणि त्यांचा पती रॉबर्ट या दोघांनाही रायबरेलीतून निवडणूक लढवायची इच्छा होती. पक्षाच्या वरिष्ठ नेत्यांनी प्रियंका यांना समजावून सांगितले, की घराणेशाहीच्या आरोपामुळे काँग्रेस कमकुवत होईल. संपूर्ण कुटुंब निवडणूक लढविण्याऐवजी राहुल यांना ब्रँड करणे आवश्यक आहे. हे प्रियंकांनाही पटले. त्यामुळेच प्रियंका यांनी वायनाड मतदारसंघातून पोटनिवडणूक लढवण्याचे मान्य केले..वास्तविक, प्रियंका यांनी वाराणसीत मोदी यांच्याविरोधात निवडणूक लढवावी, अशी पक्षाची इच्छा होती; मात्र अखेरच्या क्षणी निर्णय बदलण्यात आला. राहुल यांनी रायबरेलीतील आपल्या एका भाषणात याकडे लक्ष वेधले होते. राहुल यांनी कन्याकुमारी येथून 'भारत जोडो' यात्रेची सुरुवात केली. त्यानंतर दक्षिणेत काँग्रेस सातत्याने मजबूत होत गेली. विशेषत: केरळ, तामिळनाडू आणि कर्नाटकात. लोकसभा निवडणुकीत काँग्रेसला केरळमध्ये २० पैकी १४, तामिळनाडूमध्ये ९ आणि कर्नाटकमध्ये ९ जागा मिळाल्या. आता राहुल यांना उत्तर भारत, विशेषत: हिंदी पट्टा मजबूत करण्यावर लक्ष केंद्रित करायचे आहे, परंतु दक्षिणही कोणत्याही किंमतीवर गमावू इच्छित नाही. राहुल यांच्या सांगण्यावरून प्रियंका यांनी वायनाडमधून पोटनिवडणूक लढवण्यास होकार दिल्याचे सांगितले जाते.

प्रियंका संसदेत पोहोचल्याने काँग्रेसला ऊर्जा मिळेल. प्रियंका यांनी या वेळी ज्या उत्साहाने प्रचार केला, मंगळसूत्राबाबतचे उत्तर असो की मुस्लिम आरक्षण; त्यांनी मोदी आणि भाजप नेत्यांना जशास तसे उत्तर दिले. त्यांनी परिपक्वता दाखवली. काँग्रेसचे अनेक ज्येष्ठ नेते सभागृहाबाहेर पडले आहेत किंवा त्यांनी काँग्रेस सोडून भाजपमध्ये प्रवेश केला आहे. अशा स्थितीत त्यांच्या सभागृहात येण्याने पक्षाची विचारधारा अधिक मजबूत होणार आहे. प्रियंका संसदेत आल्याने राहुल आता भाजपसमोर एकटे पडणार नाहीत. प्रियंकांची वक्तृत्व आणि बोलण्याची शैली अतिशय नीटनेटकी आहे. त्यामुळे प्रियंका संसदेत पोहोचल्यावर सभागृहात नव्या काँग्रेसची झलक पाहायला मिळणार आहे. त्यांचे संसदेत येणे हा काँग्रेससाठी मास्टर स्ट्रोक असेल. राहुल यांना आगामी काळात उत्तर प्रदेशात आपले नेटवर्क वाढवायचे आहे. ते संपूर्ण राज्यात जनसंपर्क अभियान सुरू करू शकतात. काँग्रेसने ज्या जागांवर निवडणूक लढवली आहे, त्या जागांवरही पदयात्रा काढू शकतात. ते ग्राउंड वर्कवर भर देतील.

उत्तर प्रदेशात मोठ्या घटनांच्या ठिकाणीही ते जाऊ शकतील. यामुळे त्यांचा सार्वजनिक संपर्क आणि पक्षाचा पाठिंबा वाढेल. येत्या काही दिवसांत हे दोघे भाऊ-बहीण आपली सक्रियता आणखी वाढवू शकतात. राहुल आणि प्रियंका उत्तर प्रदेशात काँग्रेसचा पाठिंबा वाढवण्यासोबतच अखिलेश यांच्याशी असलेल्या आघाडीची पूर्ण काळजी घेतील.

प्रियंका आणि राहुल मोठ्या प्रसंगात, घटनांत अखिलेश याच्यासोबत असतील. अखिलेश यांना लोकसभेत राहुल त्यांच्या शेजारची जागा देऊ शकतात. समाजवादी पक्ष सध्या देशातील तिसऱ्या क्रमांकाचा पक्ष बनला आहे. राजकीय अवकाश व्यापताना मित्राचे अवकाश कमी होणार नाही, याची दक्षता त्यांना घ्यावी लागेल.

# संत तुकाराम महाराज पालखी व रथास चकाकी देण्याचे काम सुरू

**पिंपरी चिंचवड :** जगद्गुरू संत तुकाराम महाराज ३३९ व्या आषाढी पायी वारी पालखी सोहळ्याचे प्रस्थान येत्या २८ जून रोजी होणार आहे.त्या पार्शवभूमीवर संत तुकाराम देवस्थान संस्थान च्या वतीने तयारी करण्यात येत असून ,संत तुकाराम महाराज ,यांची चांदीची पालखी व रथास चकाकी देण्याचे काम गुरुवार ( ता.२०) पासून सुरू करण्यात आलेले आहे. कोल्हापूर जिल्ह्यातील हुपरी हे गाव चांदीच्या व्यवसायासाठी प्रसिद्ध असून याच गावचे २७ व्यापारी स्वतःचा व्यवसाय बंद करून , संत तुकाराम महाराजांच्या पालखी ,रथ तसेच तत्सम साहित्याला सुधारित आणि परंपरागत साहित्य वापरून चकाकी देण्याचे सेवाभावी वृत्तीने करू लागले आहेत.

संत तुकाराम महाराज चांदीची पालखी ,चांदीचा रथ ,अब्दागिरी ,संत तुकाराम महाराजांचा मुखवटा , पूजेचा कलश , ताम्हण ,तांब्या ,पळी , चमचा , गरुड टक्के , गरुड हनुमंत यांच्या मूर्ती ,तसेच तत्सम साहित्य ,आणि मुख्य मंदिरा मधील विठ्ठल रखुमाई ,आणि शिळा मंदिरातील ,संत तुकाराम महाराज यांच्या माघील बाजूस असणारी प्रभावळ यांना अवघ्या २४ तासाच्या आत अगदी विनामूल्य चकाकी देण्याचे काम बाबासाहेब गोंधळी ,अभयसिंह घोरपडे ,युराज माने ,सुनील केंगळे, आनंदा भडगावे, सचिन पिसाळ ,सिद्धू नायकवडे आदी एकूण २७ चांदीचे व्यापारी हे काम पूर्ण करणार आहेत.



**चकाकी करण्यासाठी सुधारित आणि परंपरागत रसायनाचा वापर❊**

**कोलगेट , पावडर ,उकाडा ,पोटॅश पावडर अशी रसायने व सुधारित आणि परंपरागत साहित्याचा वापर करून हे लकाकी देण्याचे काम केले जाते.या व्यवसायिकांनी पंढरपूर मंदिरात चांदीच्या वस्तूंना चकाकी देण्याचे काम सलग ५ वर्षे केले आहे.या माध्यमातून संत तुकाराम महाराज यांची सेवा करण्याची संधी आमच्या हुपरी गावच्या चांदीच्या कारागिरांना मिळाली.हे आम्ही आमचे थोर भाग्य समजतो. बाबासाहेब गोंधळी**

**- चांदी कारागीर हुपरी जिल्हा कोल्हापूर**

# राजेंद्र पडवळ यांना जिल्हास्तरीय गुणवंत शिक्षक पुरस्कार



**वळती :** रांजणी (ता. आंबेगाव ) येथील रयत शिक्षण संस्थेच्या नरसिंह विद्यालयाचे पर्यवेक्षक राजेंद्र पडवळ यांना नुकताच जिल्हास्तरीय गुणवंत पुरस्कार प्रदान करण्यात आला . अशी माहिती विद्यालयाचे प्राचार्य शिवाजी दुंडे यांनी दिली.

स्व . माजी आमदार शिवाजीराव पाटील यांच्या ९ व्या स्मृतिदिनानिमित्त पुणे जिल्हा माध्यमिक शिक्षक संघ, पुणे जिल्हा टी डी एफ पुणे, जिल्हा माध्यमिक शिक्षिका संघ यांच्या संयुक्त विद्यमाने 'स्व . माजी आमदार शिवाजीराव पाटील जिल्हास्तरीय गुणवंत शिक्षक पुरस्कार - २०२४ 'नरसिंह विद्यालयाचे पर्यवेक्षक राजेंद्र पडवळ यांना प्रदान करण्यात आला . राजगुरुनगर येथे मान्यवरांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. नरसिंह विद्यालयात उपशिक्षक तसेच पर्यवेक्षक म्हणून अतिशय उत्कृष्ट पणे काम पाहिले. तसेच टीडीएफच्या संघटनेमध्ये जिल्हा कार्यवाह या पदावर सुद्धा उत्कृष्टपणे काम केले. त्यांच्या या योगदानाबद्दल त्यांना हा पुरस्कार प्रदान करण्यात आला याबद्दल, रांजणी ग्रामस्थ,सर्व शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचारी ,विद्यार्थ्यांच्या वतीने त्यांचे अभिनंदन करण्यात आले.

## वीज वितरणच्या उदासीन कारभाराचा निषेध

**सातारा :** वीज ग्राहकांची गैरसोय, शेतकऱ्यांना पुरेसा वीज पुरवठा न होणे,वीज वितरण कंपनीच्या अधिकारी व कर्मचाऱ्यांचा ढिसाळ कारभार या सर्व घटनेच्या निषेधार्थ सामाजिक कार्यकर्ते व संजीवन बहुउद्देशीय सामाजिक विकास संस्थेचे अध्यक्ष रवी कांबळे यांनी कृष्णा नगर येथील वीज वितरण कार्यालयाच्या प्रवेशद्वारावर गुरुवारी मुंडन आंदोलन केले.

वीज वितरणच्या अधीक्षक अभियंतांना यावेळी निवेदन सादर करण्यात आले.

## मैदानी चाचणीसाठी ९२१ उमेदवार उपस्थिती

**कोल्हापूर :** कोल्हापूरतील पोलीस परेड ग्राउंड वर सुरू असलेल्या पोलीस भरती मैदानी चाचणी परीक्षेच्या दुसऱ्या दिवशी प्रत्यक्ष मैदानी चाचणीसाठी ९२१ उमेदवार उपस्थित होते यापैकी ७७७ उमेदवारांची चाचणी घेण्यात आली.

कोल्हापूर जिल्हा पोलीस दलाकडे चालक आणि शिपाई असे एकूण २१३ जागांसाठी कालपासून भरती प्रक्रियेला प्रारंभ झालाय. ७६५ उमेदवारांची मैदानी चाचणी प्रक्रिया पार पडली होती. आज दुसऱ्या दिवशी देखील पहाटे पाच वाजल्यापासून पोलीस भरती चाचणी परीक्षेला प्रारंभ झाला आज प्रत्यक्ष मैदानी चाचणीसाठी एकूण ९२१ उमेदवार हजर होते त्यापैकी ७७७ पात्र उमेदवारांची मैदानी चाचणी घेण्यात आली. तर दोन उमेदवारांना मैदानी चाचणीसाठी पुढील तारीख देण्यात आली. आजच्या चाचणी परीक्षेसाठी कालच्या यादीत बोलवण्यात आलेल्या एका उमेदवाराची चाचणी परीक्षा घेण्यात आली पोलीस अधीक्षक महिंद्र पंडित यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस परेड ग्राऊंडवर ही मैदानी चाचणी परीक्षा घेण्यात आली.

# सातारा मुख्यधिकारी यांनी ठेकेदार अभिजीत बापटांची चौकशी करावी : विजय सोनवणे

**सातारा :** सातारा नगरपालिका कंत्राटी कामगारांच्या प्रश्नाबाबत सातत्याने आंदोलन करत आहेत. याबाबत यापूर्वीच्या अनेक सातारा नगर पालिका मुख्याधिकाऱ्यांनी कामगारांचे प्रश्न सोडवले आहेत .पण सध्या आंदोलन घंटागाडी कामगारांना बदनामी करण्यासाठी काही प्रवृत्तीला हाताशी धरले जात आहे. त्यामुळे सातारचे प्रामाणिक व कामगारांचे हिताचे निर्णय घेणारे मुख्याधिकारी यांनी ठेकेदार अभिजीत बापटांची चौकशी करावी. अशी मागणी विजय सोनवणे यांनी पत्रकारांशी बोलताना केलेली आहे.

याबाबत माहिती अशी की, सातारा जिल्हाधिकारी कार्यालयासमोर दोन दिवसापासून कंत्राटी कामगार व जनता क्रांती दलाचे नेते सत्यवान कमाने यांच्या मार्गदर्शनाखाली या संघटनेचे पदाधिकारी विजय सोनवले, अक्षय भिसे, राणीताई किरतकर्वे व दत्ता केंगार, रोहिणी लोहार आणि घंटागाडी कंत्राटी कामगार ऊन- वारा- पावसाची तमा न बाळगता आंदोलन करत आहेत. हे आंदोलन लोकशाही मार्गाने चालत असून आंदोलन चिरडून टाकण्यासाठी बदनाम केले जात आहे. असे आरोप ही श्री सोनावले यांनी केलेला आहे.

दरम्यान, याबाबत सातारा जिल्हा प्रशासन व सातारा नगरपालिका प्रशासनाने गंभीर दखल घेतली नाही तर साताऱ्यातील सर्व कंत्राटी घंटागाडी कामगार हे कचरा संकलित करून सातारा जिल्हाधिकारी कार्यालयात टाकतील. असा इशारा देण्यात आलेला आहे.




**सातारा जिल्हाधिकारी कार्यालयात न्यायालयाच्या प्रतीक्षेत बसलेले आंदोलन व घंटागाडी कामगार (छाया- मृणाल देवकुळे, सातारा)**

# उंचावर लटकून धोकादायक रिल्स बनवणाऱ्या पुण्यातील 'त्या' तरुण-तरुणीवर गुन्हा दाखल

**कात्रज :** नवीन कात्रज हायवेवरील स्वामी नारायण मंदीर परिसरात पडक्या उंच इमारतीवरुन एक तरुणी व एक तरुण यांचा जीव ... उंचावर लटकून धोकादायक रिल्स बनवणाऱ्या पुण्यातील 'त्या' तरुण-तरुणीवर गुन्हा दाखलकात्रज:नवीनकात्रजहायवेवरील स्वामी नारायण मंदीर परिसरात पडक्या उंच इमारतीवरुन एक तरुणी व एक तरुण यांचा जीव धोक्यात टाकून केलेलाधोकादायकस्टंटचाव्हिडीओसोशल मिडीयावर चांगलाच व्हायरल झाला होता. हा व्हिडिओ शहरात सोशल मीडियावरव्हायरल झाला.अशाधोकादायक पद्धतीने रिल्स बनवल्यामुळेअनेक प्रतिक्रिया येऊ लागल्या होत्या. त्यानंतरभारती विद्यापीठपोलिसांनीव्हिडीओची खात्री करुनतरुणव तरुणीवर गुन्हा दाखल केला आहे.

स्वत:चा व इतरांचा जीव व व्यक्तिगत सुरक्षितता धोक्यात आणणारी कृती केल्याबद्दल भारती विद्यापीठ पोलीस स्टेशन येथे गुन्हा रजि नंबर भादंवि कलम ३३६, ३४ अन्वये गुन्हा दाखल केला आहे.या रिल्समधील तरुण व तरुणीचा शोध सुरु आहे. त्यांचा शोध घेवून कायदेशीर कारवाई करण्यात येईल असे पोलिसांनी सांगितले.

ही कारवाई पोलीस उप आयुक्तस्मार्तना पाटील, सहाय्यक पोलीस आयुक्त नंदीनी वग्याणी, भारती विदयापीठ पोलीस स्टेशनचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री डी. एस. पाटील, पोलीस निरीक्षक (गुन्हे) शरद झिने, व पथकाने केली. तसेच अशा प्रकारे कोणत्याही प्रकारे धोकादायक कृत्य करू नये असे आवाहन पुणे पोलिसांकडून करण्यात येत आहे.



# ओबीसी आरक्षणाला धक्का लागणार नाही : मुख्यमंत्री

**वडीगोद्री (जि. जालना) :** मागील आठ दिवसांपासून वडीगोद्री येथेओबीसी आरक्षणबचावसाठी लक्ष्मण हाके आणि नवनाथ वाघमारे यांचे उपोषण सुरू आहे. या उपोषणकर्त्यांची विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार यांनी गुरुवारी भेट घेऊन चर्चा केली. यावेळी त्यांनी मुख्यमंत्रीएकनाथ शिंदेयांच्याशी फोनवर संवाद साधला.ओबीसी आरक्षणालाकसलाही धक्का लागणार नाही, हे यापूर्वीच सांगितले आहे. उद्याच (शुक्रवारी) शासकीय शिष्टमंडळ वडीगोद्री येथे पाठवितो, असे मुख्यमंत्र्यांनी वडेट्टीवार यांना फोनवरून सांगितले.

वडेट्टीवार म्हणाले, काल आणि आजही मुख्यमंत्र्यांशी आपण बोललो आहोत. ओबीसी समाजातजन्मलेली व्यक्ती म्हणून ओबीसी समाजाच्या पाठीमागे उभा राहणे माझे कर्तव्य आहे. मतांसाठी समाजाला भडकविण्यात आल्याचा आरोपही वडेट्टीवार यांनी केला. उद्या शिष्टमंडळ येणार आहे. लागले तर मीपण येतो. उद्या आंदोलन समाप्त करू या, असेही ते म्हणाले. आरक्षणाचे ताट वेगवेगळे असावे : आंबेडकर

वंचित बहुजन आघाडीचे नेते प्रकाश आंबेडकर यांनीही गुरुवारी उपोषणकर्ते हाके, वाघमारे यांची भेट घेऊन चर्चा केली. ओबीसी आणि मराठ्यांच्या आरक्षणाचे ताट वेगवेगळे असले पाहिजे. परंतु, दोघांना एकमेकांसमोर विधानसभेपर्यंत हे भिडवत राहतील, अशी माझी धारणा असल्याचे सांगत त्यांनी सरकारवर टीका केली.उपचार घेण्यास उपोषणकर्त्यांचा नकार

हाके आणि वाघमारे यांची प्रकृती दिवसेंदिवस खालावत असून, डॉक्टरांनी दोन्ही उपोषणकर्त्यांना उपचार घेण्याचा सल्ला दिला आहे. मात्र, जोपर्यंत मागण्या पूर्ण होत नाहीत, तोपर्यंत उपचार घेणार नसल्याचे उपोषणकर्त्यांनी सांगितले.लातुरात ओबीसींचे साखळी उपोषण

**लातूर :** ओबीसी नेते लक्ष्मण हाके यांच्या उपोषण आंदोलनाला पाठिंबा देण्यासाठी लातूर येथील गांधी चौकात साखळी उपोषण सुरू करण्यात आले आहे. हरिभाऊ गायकवाड यांच्यासह ओबीसी तसेच व्हीजेएनटी प्रवर्गातील कार्यकर्ते उपोषणात सहभागी झाले आहेत.



**ओबीसी आरक्षणाला धक्का लावू नये या मागणीसाठी ओबीसी समाज बांधवांनी गुरुवारी लोहा तालुक्यातील माळाकोळी येथे नांदेड-लातूर महामार्गावर रास्ता रोको केला. त्यामुळे वाहतूक ठप्प झाली होती....अन्यथा ओबीसी पेटून उठेल : अशोक जीवतोडे**

## नांदेडमध्ये रास्ता रोको

**चंद्रपूर : मराठा समाजाला आरक्षण देताना ओबीसींच्या आरक्षणाला कुठेही धक्का लागू नये याची काळजी सरकारने घ्यावी, अन्यथा ओबीसी पेटून उठेल, असा इशारा भाजपच्या ओबीसी मोर्चाचे प्रदेश उपाध्यक्ष डॉ. अशोक जीवतोडे यांनी दिला आहे.**

मालक, मुद्रक, प्रकाशक नरेश व्ही. देसाई यांनी सरस्वती प्रिंटिंग प्रेस, १६ मंगळवार पेठ, सातारा येथे मुद्रित करून, रामकमल बिल्डिंग, ७, रामकृष्ण कॉलनी, सिव्हिल हॉस्पिटल रोड, सातारा येथून प्रकाशित केले. संपादक : नरेश व्ही. देसाई. फोन : ९९६०३५०९९९, Email : rajdand.wmgmail.com, RNI NO. : ७२१०५/९९
Owner, Printer, Publisher Naresh V. Desai. Printed at Saraswati Printing Press, 16 Mangalwar Peth, Satara. Published from Ramkamal Building, 7, Ramkrishna Colony, Civil Hospital Road, Satara. Editor : Naresh V. Desai. Phone : 9960350999, Email : rajdand.wmgmail.com, RNI NO. : 72105/99

# हडपसर गाडीतळ ते ससाणेनगर छत्रपती शिवाजीमहाराज पुतळापर्यंत मोर्चा

## हिन्दु संघटनानी घोषणाबाजी करीत झाल्या घटनेचा निषेध व्यक्त केला

**हडपसर :** हिन्दुस्थानचे अराध्य दैवत छत्रपती शिवाजी महाराज यांच्या स्मारक पुतळ्यास एका पठाण नावाच्या इसमाने दगड मारुन छत्रपतींचा अवमान विटंबना केली .त्या इसमास हडपसर पोलीसांनी अटक केली.परंतु हडपसर मधील वातावरण शांत झालेले नव्हते, रविवारी हिन्दु संघटनांनी , सकल हिन्दु समाज बांधवांनी महापुरुषांचा अवमान विटंबना करणा-या विरोधात तसेच वैष्णवी देवी येथे जाणा-या भाविकांवर दहशतवादी हल्ला झाला याच्या निषेधार्थ हडपसर मध्ये सकल हिन्दु समाजाच्या वतीने जन आक्रोश मशाल मोर्चाचे आयोजन करण्यात आले होते.

हडपसर गाडीतळ येथून मशाल पेटवून घोषणाबाजी करीत सकल मराठा समाज हिन्दु संघटनांनी मोर्चा हडपसर गाडीतळ ते ससाणेनगर छत्रपती शिवाजीमहाराज पुतळ्याजवळ विराट मोर्चा काढून महाआरती करत , विटंबना झालेल्या पुतळ्याची दुग्धभिषेक घालून झाल्या घटनेचा निषेध व्यक्त करण्यात आला.

मोर्चात सर्व पक्षीय मराठा हिन्दु समाज बांधव व महिला मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

मोर्चात पाकिस्तान मुर्दाबादच्या घोषणा ऐकायला येत होत्या.

हडपसर भागात आतापर्यंतचा सर्वात मोठा मराठा समाजाने काढलेला होता. तरुण वर्ग हातात भगवे ध्वज फडकावत छत्रपती शिवाजी महाराज कि जय , जय भवानी जय शिवाजी आदी घोषणांनी हडपसर भाग दणाणून सोडला.

हडपसर मधील गजबजलेली मुख्य बाजारपेठ तसेच ससाणेनगर रस्त्यावरील दुकाने हडपसर बंदची हाक दिल्याने सर्वत्र शुकशुकाट दिसत होता.

व्यापारी वर्गाने दिवसभर दुकाने कडकडीत बंद ठेवत हडपसर बंदला पाठिंबा दिला.

मोर्चात अनुचित प्रकार घडू नये म्हणून एसीपी अश्विनी राख मॅडम व हडपसर पोलीस स्टेशनचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक संतोष पांढरे , गुन्हे शाखेच्या पोलीस निरीक्षक मंगल मोढवे सह हडपसर पोलीस स्टाफ मोर्चावर नजर ठेवून मोठा बंदोबस्त तैनात करण्यात आला होता. सकल मराठा समाजाने मोर्चा शांततेत काढून झाल्या

# शिवसेनेतील फुटीला दोन वर्षे पूर्ण; निवडणुकीत ठाकरे गट वरचढ

**मुंबई :** विधान परिषदेच्या द्वैवार्षिक निवडणुकीची मतमोजणी सुरू असतानाच एकनाथ शिंदे यांनी १६ आमदारांसह सुरत गाठले आणि शिवसेना विधिमंडळ पक्षात उभी फूट पडली. त्याला आज दोन वर्षे पूर्ण झाली. या दोन वर्षांत शिवसेनेच्या दोन गटांमध्ये परस्परांवर कुरघोडीचे अनेक प्रयत्न झाले. ठाकरे गटाचे नाव आणि चिन्हही गेले. पण निवडणुकीत ठाकरे गटाने शिंदे यांच्यावर मात करून आपलीच शिवसेना खरी हे अधोरेखित करण्याचा प्रयत्न केला आहे.

एकनाथ शिंदे यांच्या बंडाला दोन वर्षे पूर्ण होत असताना पुलाखालून बरेच पाणी वाहून गेले. शिवसेना आणि ठाकरे हे समीकरण असताना, निवडणूक आयोगाने शिवसेना नाव आणि धनुष्यबाण चिन्ह मुख्यमंत्री एकनाथ शिंदे गटाला दिले. यामुळे उद्धव ठाकरे यांच्या शिवसेनेचे नाव बदलले आणि मशाल हे नवीन चिन्ह मिळाले. लोकसभा निवडणूक प्रचारात असली आणि नकली शिवसेना हा वाद रंगला. लोकसभा निवडणुकीच्या निमित्ताने या पक्षाच्या दोन गटांची ताकद स्पष्ट झाली. शिवसेनेच्या शिंदे गटाचा स्ट्राइक रेट ठाकरे गटापेक्षा जास्त असला तरी ठाकरे गटाला मिळालेली एकूण मते (१६.७२ टक्के) ही शिंदे गटापेक्षा (१२.९५ टक्के) जास्त आहेत. शिंदे यांच्याबरोबर गेलेल्या ४२ आमदारांपैकी २० आमदारांच्या मतदारसंघांत महायुतीचे उमेदवार पिछाडीवर आहेत. यामुळेच जनतेच्या न्यायालयाचा कौल आम्हाला मिळाल्याचा दावा उद्धव ठाकरे यांनी केला आहे.

पक्षफुटीनंतर महाविकास आघाडीला मिळालेल्या घवघवीत यशामुळे शिवसेना ठाकरे गटाचा उत्साह वर्धापन दिनाच्या कार्यक्रमात ओसंडून वाहत होता. उद्धव ठाकरे यांचाही आत्मविश्वास वाढला होता. दोन वर्षांपूर्वी विधान परिषदेची



निवडणूक असताना शिवसेनेच्या आमदारांनी मतदान करून गटागटाने ४२ आमदारांनी सुरत, गुवाहटी, गोव्याकडे कूच केली. शिवसेना फुटीवर सर्वोच्च न्यायालय, केंद्रीय निवडणूक आयोग व विधानसभा अध्यक्ष अशा तीन पातळीवर लढाई सुरू होती. विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांनी शिंदे गटाच्या बाजूने निर्णय दिला. केंद्रीय निवडणूक आयोगाने शिंदे यांना नाव, चिन्ह बहाल केले. त्यामुळे ठाकरे गटाची आशा आता फक्त सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयावर आहे.

शिवसेना हे नाव आणि धनुष्यबाण हे चिन्ह शिंदे गटाला मिळाले. मात्र लोकसभा निवडणुकीत ठाकरे गटाने तुलनेने चांगले यश मिळवले आहे.

**विधानसभेत कोणाची बाजी?**

**लोकसभेपाठोपाठ विधानसभेत चागंले यश मिळवून शिंदे गटाचे नामोनिशाण पुसून टाकण्याचा उद्धव ठाकरे यांचा निर्धार आहे. लोकसभा निवडणुकीत ठाकरे गटाचे दोन खासदार अधिक निवडून आल्याने शिंदे गटाची काहीशी अडचण झाली.**

**आमचीच शिवसेना असली हा दावा करणे आता शक्य होत नाही. विधानसभा निवडणुकीत कोणता गट बाजी मारतो यावर पुढील समीकरणे अवलंबून असतील. शिंदे यांना बाळासाहेब ठाकरे यांचे नाव, चिन्ह, पक्ष सोडून मैदानात उतरण्याचे आव्हान ठाकरे गटाने दिले आहे.**

# मराठा आरक्षणाचे भवितव्य टांगणीला?

**मुंबई :** बिहारमधील दुर्बल घटकांसाठी लागू करण्यात आलेले वाढीव १५ टक्के आरक्षण उच्च न्यायालयाने रद्दबातल ठरविल्याने याच मुद्द्यावर मराठा समाजाला देण्यात आलेले १० टक्के आरक्षण कायद्याच्या कसोटीवर टिकेल का, असा प्रश्न निर्माण झाला आहे.

बिहारमध्ये नितीशकुमार सरकारने जातनिहाय जनगणनेच्या आधारे दुर्बल घटकांच्या आरक्षणात १५ टक्के वाढ करण्याचा निर्णय घेतला होता. यामुळे बिहारमधील आरक्षणाचे प्रमाण ५० टक्क्यांवरून ६५ टक्क्यांवर गेले होते. याशिवाय केंद्र सरकारचे आर्थिकदृष्ट्या मागासवर्गासाठी १० टक्के आरक्षण लागू आहेच. बिहारमधील आरक्षणात वाढ करण्याच्या निर्णयाला उच्च न्यायालयात आव्हान देण्यात आले होते.

बिहार सरकारचे वाढीव आरक्षण रद्द करताना इंद्रा सहानी विरुद्ध भारत सरकार खटल्यात ५० टक्के आरक्षणाची मर्यादा ओलांडू नये, असा आदेश सर्वोच्च न्यायालयाने दिला होता. बिहार सरकारचे वाढीव आरक्षण रद्द करताना ५० टक्के आरक्षणाचा मुद्दाही महत्त्वाचा ठरला. महाराष्ट्रात आधीच ५२ टक्के आरक्षण लागू होते. म्हणजेच सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या मर्यादेपेक्षा दोन टक्के आरक्षण अधिकचे होते. मराठा समाजाला १० टक्के आरक्षण देण्याच्या निर्णयाने राज्यातील आरक्षणाचे प्रमाण हे ६२ टक्के झाले. आरक्षणाची मर्यादा आधीच ओलांडली गेली आहे.

# भर पावसात सुरु असलेल्या पोलीस भरतीसाठी आलेल्या उमेदवारांची राहण्याची सोय करा

## काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोलेंची गृहमंत्री व राज्याच्या मुख्य सचिवांकडे फोन करुन मागणी

**मुंबई :** पोलीस विभागातील १७ हजार जागांसाठी भरती प्रक्रिया सुरु असून यासाठी तब्बल १७ लाख उमेदवारांनी अर्ज केले आहेत. राज्यातील विविध जिल्ह्यात होत असलेल्या या पोलीस भरतीसाठी आलेल्या मुला-मुलींच्या राहण्याची काहीही सोय नाही, त्यांची प्रचंड गैरसोय होत आहे. भरपावसात पोलीस भरती सुरु असून या भरतीसाठी आलेल्या मुलांना पावसात रस्त्याच्या कडेला, उड्डाण पुलाखाली आसरा घ्यावा लागत आहे. पोलीस भरतीसाठी आलेल्या या मुलांची राहण्याची व इतर



व्यवस्था सरकारने करावी, अशी मागणी महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष नाना पटोले यांनी केली आहे.

काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी गृहमंत्री देवेंद फडणवीस आणि राज्याचे मुख्य सचिव डॉ. नितीन करीर यांनी फोन करून या मुलांच्या राहण्याची सोय करण्याची मागणी केली आहे. तसेच राज्यसेवा २०२४ साठी डेप्युटी कलेक्टर, डीवायएसपी या पदासहित सर्व संवर्गाच्या जागा लवकरात लवकर भरण्यात याव्यात. जुन्या पॅटर्ननुसार होणाऱ्या शेवटच्या परीक्षेत गोरगरीब मुलांना न्याय द्यावा. कर सहायक प्रतिक्षा यादीमधील मुलांना तातडीने नियुक्ती देण्यात यावी. combined exam गृप इ व गृप C ची जाहिरात लवकरात लवकर प्रसिद्ध करण्यात यावी. महाराष्ट्र लोकसेवा आयोगाने उपजिल्हाधिकारी, तहसीलदार यासह सर्व रिक्त पदांची जाहिरात काढून सर्व पदे भरावीत, अशी मागणीही नाना पटोले यांनी केली आहे.



# सिध्दांत महाडिक यांची नौदलात वैमानिक म्हणून निवड

**सातारा :** येथील सामाजिक कार्यकर्ते श्री रवींद्र महाडिक यांचा मुलगा सिद्धांत यांची भारतीय नौदल सेनेमध्ये वैमानिक म्हणून निवड .या निवडीबद्दल आज खासदार श्रीमंत छत्रपती उदयनराजे भोसले यांच्या हस्ते पुष्पगुच्छ देऊन सत्कार तसेच भावी वाटचालीस व देश सेवेसाठी शुभेच्छा देण्यात आल्या. सिद्धांत याचे शिक्षण बी. टेक .असून त्याचे प्राथमिक शिक्षण मोना स्कूल सदर बाजार सातारा व सर्विस प्रीपेटरी इन्स्टिट्यूट औरंगाबाद येथे झाले .त्याने यासाठी चार वर्ष कोची येथील भारतीय नौदल अकॅडमी मध्ये खडतर प्रशिक्षण घेतले. सत्कार वेळी माजी उपनगराध्यक्ष व माझी नवसैनिक शंकर माळवदे रवींद्र महाडिक कुंदन चव्हाण व इतर नागरिक उपस्थित होते.



# पुणे-बंगळुरू महामार्गाच्या सहापदरीकरणाचा फटका, पाणी साचल्यामुळे वाहतूक खोळंबली

**सांगली** - पुणे-बंगळुरू या आशियाई महामार्गाच्या सहापदरीकरणाचा फटका गुरुवारी सायंकाळी या महामार्गावरून प्रवास करणाऱ्या सर्व वाहनांना बसला.आटके ता. कराड ... पुणे-बंगळुरू महामार्गाच्या सहापदरीकरणाचा फटका, पाणी साचल्यामुळे वाहतूक खोळंबलीसांगली- पुणे-बंगळुरू या आशियाई महामार्गाच्या सहापदरीकरणाचा फटका गुरुवारी सायंकाळी या महामार्गावरून प्रवास करणाऱ्या सर्व वाहनांना बसला.आटके ता. कराड फाट्यावरील सेवारस्त्यावर मोठ्या प्रमाणात पाणी साचल्यामुळे याठिकाणी सुमारे तासभर वाहतूक खोळंबली होती.

पूर्वेला आटके फाटा व पश्चिमेला नारायणवाडी फाटा असून याठिकाणी जुन्या उड्डाणपुलाच्या रुंदिकरणाचे काम सुरू असल्याने पुणेच्या व कोल्हापूरच्या दिशेने जाणारी सर्व वाहने सेवा रस्त्यावरून जात असून या सेवा रस्त्यावर आज पडलेल्या मोठ्या पावसाने पाणी जमा झाल्याने याठिकाणी बराच वेळ वाहतूकीची कोंडी झाली होती,पुणे, कराड, सातारा बाजूकडून कोल्हापुरच्या दिशेने निघालेल्या प्रवाशांचे या वाहतूक कोंडीमुळे हाल झाले.आटके फाटा येथील सेवा रस्त्यावर मोठ्या प्रमाणात पाणी साचल्यामुळे याठिकानाहून प्रवास करणाऱ्या दुचाकी चालकांना व पादचाऱ्यांना रस्त्यावर उतरून पाण्यातून चालत बाहेर जावे लागले, या पाण्यात दुचाकी कार व रिक्षा इंजिन मध्ये पाणी जावून बंद पडल्या होत्या, स्थानिक गावातील शाळकरी विद्यार्थ्यांना याचा फटका बसला.

याशिवाय वाठार जवळील सेवा रस्त्यावर,पेठनाका सेवा रस्त्यावर व उड्डाणपुलाच्या खाली देखील मोठ्या प्रमाणात पाणी जमा होवून वाहतुकीस अडथळा निर्माण झाला होता.

## दरोड्यातील आरोपी जेरबंद

**सातारा :** सातारा जिल्ह्यातील वडूज व मसूरला दोन वर्षांपूर्वी पडलेल्या सशस्त्र दरोड्यातील फरार असलेल्या मोस्ट वॉन्टेड सराईत आरोपीच्या सातारा पोलिसांनी अखेर मुसक्या आवळल्या. अतुल लायलन ऊर्फ नायलन भोसले (वय २६, रा. कासारी, ता. आष्टी, जि. बीड) असे त्याचे नाव आहे. दुहेरी मोक्‍क्यामध्ये सुमारे दोन वर्षांपासून तो पोलिसांना हवा होता.

# सातारा जिल्ह्यात पश्चिम भागात पावसाचा जोर वाढला

## दुपारनंतर संततधार

**सातारा :** जिल्ह्याच्या पश्चिम भागात आठ दिवसानंतर पावसाने पुन्हा जोर धरला असून सायंकाळी पाचपर्यंतच्या ९ तासांत सर्वाधिकपाऊसनवजाला ६७ तर कोयनेला ३९ आणि महाबळेश्वरला ४० मिलीमीटर झाला. तर सातारा शहरातही अनेक दिवसानंतर पावसाला सुरूवात झाली. दुपारी तीनला सुरू झालेल्या पावसाची सायंकाळपर्यंत संततधार होती. त्यामुळे नागरिकांना बाहेर पडणेही मुश्कील झालेले.

जिल्ह्यात मान्सूनचापाऊस७ जूनपूर्वीच दाखल झाला. मागील १५ दिवसांत पूर्व आणि पश्चिम भागातही पावसाने हजेरी लावली. सध्याही पाऊस सुरूच



आहे. पण, पावसाचे प्रमाण कमी झालेले. तरीही गेल्या वर्षीच्या तुलनेत यंदा पाऊस लवकर सुरू झाला. परिणामी पेरणी आणि भात लागणीला सुरुवात झाली. आतापर्यंत माण, खटाव, फलटण या तालुक्यात चांगला पाऊस पडला आहे. यामुळेशेतीमशागती आणि खरीप हंगामातील पेरणीच्या कामाला वेग आला आहे.

त्यातच वारंवार पाऊस होत असल्याने जमिनीला वापसा आलेला नाही. त्यामुळे वापसा नसणाऱ्या ठिकाणची पेरणी खोळंबली आहे. तर चांगल्या पावसामुळे पूर्व भागातील ओढ्यांना पाणी वाहात आहे. अनेक गावांतील बंधाऱ्यात चांगला पाणीसाठा झाला आहे. त्यामुळे पेरणीनंतर पिकांना पाणी कमी पडणार नाही. तसेच तलावातही साठा वाढला असल्याने पिण्याच्या पाणी योजनांना फायदाच होणार आहे. त्यामुळे अनेक गावांचे टँकरही बंद झाले आहेत.

पश्चिम भागातही पाऊस पडत असला तरी जोर नव्हता. मागील आठ दिवसांपासून पावसाची उघडझाप होती. त्यामुळे अजूनही प्रमुख धरणात पाण्याची आवक सुरू झालेली नाही. अशातच गुरुवारी सकाळपासूनच पश्चिम भागात पावसाला जोरदार सुरूवात झाली आहे. यामुळे ओढे खळाळून वाहत आहेत. कास, बामणोली, कोयना, नवजा, तापोळा, महाबळेश्वर भागात पावसाची जोर वाढला आहे. त्यामुळे लवकरच प्रमुख धरणातही पाणीसाठा वाढणार आहे.

### कोयना धरणात१४.९० टीएमसी पाणीसाठा

**कोयना धरणातपाण्याची अजून मोठ्या प्रमाणात आवक सुरू झालेली नाही. गुरुवारी सायंकाळच्या सुमारास धरणात १४.९३ टीएमसी पाणीसाठा झाला होता. तर एक जूनपासून आतापर्यंत कोयनेला ३३९ आणि नवजा येथे ४७१ तर महाबळेश्वरला ३२७ मिलीमीटर पर्जन्यमानाची नोंद झाली आहे. गेल्यावर्षी पश्चिम भागात जून महिन्याच्या उत्तरार्धात दमदार सुरूवात झालेली.**

# झाडाणी प्रकरणात आमदार मकरंद पाटील लाभदायक, विराज शिंदे यांचा आरोप

**सातारा :** झाडाणी गाव पुनर्वसित आहे. गावात एकही वस्ती नाही. तरीही वाईचे आमदारमकरंद पाटीलयांनी आमदारपदाचा गैरवापर करुन वीज कंपनीच्या अधिकाऱ्यांना दबावाखाली झाडाणी येथे वीजट्रान्स्फर आणि वीजजोडणी करण्यास लावली. यासाठी जिल्हा वार्षिक योजनेतील ५१ लाखांचा निधी वापरण्यात आला. त्यामुळे आमदार पाटील जननायक नसून लाभदायक आहेत, असा गंभीर आरोप युवक काँग्रेसचे माजी जिल्हाध्यक्ष विराज शिंदे यांनी केला.

सातारा येथे जिल्हा काँग्रेस कमिटीत आयोजित पत्रकार परिषदेत ते बोलत होते. यावेळी



काँग्रेसचे जिल्हा सरचिटणीस नरेश देसाई उपस्थित होते. विराज शिंदे म्हणाले, महाबळेश्वर तालुक्यातील झाडाणी गावातील लोक रायगड जिल्ह्यात पुनवर्सित झाले आहेत. गावात एकही मानवीवस्ती नाही. या गावात मोठ्या अधिकाऱ्यांनी आणि राजकीय लोकांनी जमिनी घेतल्यात. चंद्रकांत वळवी या अधिकाऱ्याचीही जमीन असल्याचे समजते. तसेच सालोशी येथील वळवी व सावे वस्ती येथे आदित्य चंद्रकांत वळवी यांनी सुमारे ४० एकरात अनाधिकृतरित्या रिसॉर्टचे बांधकाम करुन अनेक झाडांची कत्तल केली.

कोणत्याही प्रकारची रॉयल्टी न भरता मोठ्या प्रमाणात उत्खननही करण्यात आले आहे. या ठिकाणी रिसॉर्टचे बेकायदेशीर बांधकाम करताना वीजपुरवठा करण्यात आला. यासाठी जिल्हा वार्षिक योजना आराखड्यातून निधी उपलब्ध होण्यासाठी वाईचे आमदारमकरंद पाटीलयांनी वीज कंपनीच्या अधीक्षक अभियंत्यांना शिफारस पत्र दिले होते. त्यानुसारच हा वीजपुरवठा करण्यात आला. आजही तेथे वळवीवस्ती अस्तित्वात नाही. मात्र, आमदार पाटील यांनी पदाचा गैरवापर करुन अधिकाऱ्यांवर दबाव आणला. त्यानंतरच रिसॉर्टला वीजपुरवठा उपलब्ध झाला.-वाईचे आमदार मकरंद पाटील यांनी पदाचा गैरवापर केला आहे. त्यांच्यावर कायदेशीर कारवाई होण्यासाठी पोलिस अधीक्षकांना निवेदन देण्यात आले आहे. त्यामुळे पाटील यांच्यावर फौजदारी गुन्हा दाखल करावा, अशी आमची मागणी आहे. अन्यथा उच्च न्यायालयात याप्रकरणी याचिका दाखल करणार आहे, असा इशाराही विराज शिंदे यांनी या पत्रकार परिषदेत दिला आहे.

# माझे हितसंबंध नाहीत; चौकशीला सामोरे जाण्याची तयारी : मकरंद पाटील

**सातारा :** सालोशीतील वळवीवस्तीवर विद्युतीकरण काम जिल्हा नियोजन आराखड्यांतर्गत उपसरंपच विठ्ठल मोरे आणि स्थानिक कार्यकर्त्यांच्या मागणीनुसार मंजूर केले होते. याप्रकरणी कोणीही दोषी असल्यास कारवाई करावी. माझे कोणाशीही आणि कसलेही हितसंबंध गुंतलेले नाहीत. मी फक्त जनतेच्या हिताचा विचार करुन कामे करीत असल्यामुळे कोणत्याही चौकशीला सामोरे जाण्याची तयारी आहे, असे स्पष्टीकरण आमदार मकरंद पाटील यांनी दिले.

युवक काँग्रेसचे माजी जिल्हाध्यक्ष विराज शिंदे यांनी पत्रकार परिषदेत आमदार मकरंद पाटील यांच्यावर झाडाणी येथील प्रकरणात आरोप केल्यानंतर आमदार पाटील यांनी प्रसिध्दीपत्रक दिले आहे. या पत्रकात त्यांनी म्हटले आहे की, महाबळेश्वर तालुक्यातील सालोशीतील वळवीवस्तीवर विद्युतीकरण काम मंजूर केले. कारण, ट्रान्सफॉर्मर बसविल्यास आजुबाजुच्या गावातील लोकांचा विजेचा आणि पाण्याचा प्रशन सुटण्यास मदत होणार आहे.

संबंधित पत्र हे विद्युतीकरणासाठी दिलेले होते. यामध्ये मी याकामासाठी किती रक्कम लागणार हे नमुद केले नव्हते. त्याबाबतचे अंदापत्रक हे संबंधीत अधिकाऱ्यांनी करावयाचे असते. यामधून कोणा एका व्यक्तीचा फायदा व्हावा असा कोणताही हेतू नव्हता. चंद्रकांत वळवी या इसमाशीही माझा कोणताही संबंध नाही. लोकप्रतिनिधींनी शिफारस पत्र दिल्यानंतर संबंधीत गावाची पाहणी करुन योग्य ती कार्यवाही करणे प्रशासन आणि अधिकाऱ्यांचे काम असते.

# पहिल्याच पावसात मुंबईची तुंबई!

## मध्य रेल्वेची वाहतूक विस्कळीत, तर सीएसएमटी लोकलची धाव परळ, कुर्ल्यापर्यंत

**मुंबई :** पहिल्याच पावसात मुंबईची तुंबई झाल्याचे पाहायला मिळत आहे. अनेक परिसरात पाणी साचले आहे. तर दुसरीकडे मध्य रेल्वेची वाहतूक विस्कळीत झाल्यामुळे सीएसएमटी लोकल परळ, कुर्ल्यापर्यंतच धावत आहे.

येत्या २४ तासांत मुंबई शहर आणि उपनगरात मध्यम ते मुसळधार पाऊस पडण्याची शक्यता आहे. मुंबईत सकाळपासून मुसळधार पावसाने सुरुवात केली आहे. तर काही ठिकाणी ढगाळ वातावरण आहे. मुंबई, पालघर, ठाणे, रत्नागिरी, रायगड, सिंधुदुर्ग आणि विदर्भात हवामान खात्याने यलो अलर्ट जारी करण्यात आला आहे. तर दुसरीकडे मुंबईत पावसाचे आगमन झाल्यानंतर रेल्वे पुन्हा एकदा उशिराने धावत आहेत. मध्य रेल्वेची वाहतूक उशिराने धावत आहे.

**मध्य रेल्वेची वाहतूक विस्कळीत**

मध्य रेल्वेवरील छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस



(सीएसएमटी) येथे पायाभूत सुविधांची कामे सुरू असल्याने जून महिन्याच्या सुरुवातीपासून लोकल सेवा विस्कळीत झाली आहे. तर, गुरुवारी सकाळी ९.५० ची ठाणे - सीएसएमटी लोकल सीएसएमटीऐवजी परळ आणि कुर्ल्यापर्यंतच चालवण्यात येत आहे. त्यामुळे प्रवाशांचा गोंधळ उडत आहे. मध्य रेल्वेच्या गलथान कारभारावर प्रवाशांनी संताप व्यक्त केला आहे. दरम्यान, सीएसएमटी येथे देखभाल दुरुस्तीच्या कामामुळे काही लोकल परळपर्यंत धावत आहेत, असे मध्य रेल्वेकडून सांगण्यात आले.

**२५ जूनपर्यंत मुसळधार पाऊस**

हवामान विभागाच्या अंदाजानुसार २५ जून दरम्यान मुंबई, ठाणे, पालघर, रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग जिल्ह्यात मुसळधार ते अति मुसळधार पाऊस पडेल. तसेच हवामान खात्याच्या अंदाजानुसार येत्या ३ ते ४ दिवसांत राज्याच्या काही भागात मुसळधार पावसाचा इशारा देण्यात आला आहे. विदर्भ, मध्य महाराष्ट्र आणि कोकणात जोरदार पाऊस पडेल. अशा परिस्थितीत मुंबई, पुणे, ठाणे, रायगड आणि रत्नागिरी जिल्ह्यात मुसळधार पाऊस पडेल, असा इशारा देण्यात आला आहे. याशिवाय पश्चिम आणि उत्तर महाराष्ट्राच्या काही भागात पावसाचा इशाराही देण्यात आला आहे.

# सार्वजनिक बांधकाम विभागाच्या रस्त्यावरच होतय अनधिकृत भिंतीचे अतिक्रमण

## सह्याद्री शेतकरी संघटनेचे राज्यअध्यक्ष रमेश शिंदे, भाऊ वारूळे यांनी अतिक्रमण हटवण्याची केली मागणी

**नारायणगाव :** सार्वजनिक बांधकाम विभागाच्या नारायणगाव - वारूळवाडी ते सावरगाव - चिंचोली या राज्य मार्गावर वारूळवाडी ग्रामपंचायत च्या समोर सार्वजनिक बांधकाम विभागाच्या जागेमध्येच अनधिकृत पणे भिंत बांधून अतिक्रमण करण्यात आले आहे.

हे अतिक्रमण ग्रामोन्नती मंडळाने केले असल्याचा आरोप सह्याद्री शेतकरी संघटनेचे राज्य अध्यक्ष रमेश शिंदे व माजी ग्रामपंचायत सदस्य भाऊ वारुळे यांनी केला आहे. अशा प्रकारे बेकायदेशीरपणे व अनधिकृतपणे केलेले बांधकाम तात्काळ थांबवून अतिक्रमण हटवावे अशी मागणी वारुळे व शिंदे यांनी केली आहे. येथे भिंत बांधल्याने रस्ता आणखी अरुंद होऊन भविष्यात अपघात होण्याची शक्यता आहे या रस्त्यावर रोज सुमारे चार ते साडेचार हजार विद्यार्थी व पालक ये जा करत असतात.

दरम्यान सार्वजनिक बांधकाम विभागाचे उप



अभियंता डी पी रायकर यांच्याशी संपर्क साधला असता त्यांनी ग्रामोन्नती मंडळाला नोटीस बजावली असल्याचे सांगितले तसेच यापूर्वी देखील रस्ता रुंदीकरणाच्या वेळी ग्रामोन्नती मंडळाच्या पदाधिकाऱ्यां बरोबर रस्ता किती रुंद करावा या विषयावर वाद झाल्याचे सांगितले. याबाबत वारूळवाडी चे सरपंच राजेंद्र मेहेर यांच्याशी संपर्क साधला असता त्यांनी सार्वजनिक बांधकाम विभाग व पोलीस स्टेशनच्या अधिकाऱ्यांबरोबर याबाबत पत्रव्यवहार झाल्याचे सांगितले.

संरक्षण भिंतीच्या अतिक्रमणाचा हा प्रकार अनेक ग्रामस्थांना आवडला नसून नाव न छापण्याच्या अटीवर अनेक ग्रामस्थांनी सांगितले की, रस्त्यात केलेले अतिक्रमण हे बेकायदेशीरच आहे ते तात्काळ हटवावे अशी मागणी केली आहे.

## सरकारकडून दोन समाजात भेदभाव नको : विजय वडेट्टीवार

**जालना :** संख्येने मोठा असूनही इतर मागासवर्गीय समाज एकत्र येत नाही, आक्रमक होत नाही याचा अर्थ कोणीही येऊन आमच्या छाताडावर नाचावे, असा होत नाही, अशा कडक शब्दात काँग्रेस आणि इतर मागासवर्गीय समाजाचे नेते विजय वडेट्टीवार यांनी दिला आहे. सरकारने दोन समाजांमध्ये भेदभाव न करता सम प्रमाणात न्याय मिळवून देण्याची काळजी घ्यावी, याची जाणीवही त्यांनी करून दिली.

आरक्षण बचाव या मागणीसाठी उपोषण करणारे ओबीसी नेते लक्ष्मण हाके आणि नवनाथ वाघमारे यांची वडेट्टीवार यांनी उपोषण स्थळी जाऊन भेट घेतली. तिथूनच त्यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याशी भ्रमणध्वनी वरून संपर्क साधला. उपोषण सुरू होऊन एक आठवडा झाला तरी सरकारचे शिष्टमंडळ न आल्याबद्दल त्यांनी नाराजी व्यक्त केली. त्यावर मुख्यमंत्री शिंदे यांनी दोन मंत्र्यांची शिष्टमंडळ उद्याच उपोषणकर्त्यांची भेट घेईल, अशी ग्वाही दिली.

ओबीसी समाज संख्येने मोठा आहे. त्यामध्ये शेकडो जातींचा समावेश आहे. मात्र हा समाज मोठ्या प्रमाणावर एकत्र येऊन आक्रमक होत नाही. याचा अर्थ आम्ही इतरांची दादागिरी आणि अन्याय सहन करू, असा समज कोणी करून घेऊ नये, असा इशाराही वडेट्टीवार यांनी दिला.

आपल्या न्याय हक्कांसाठी आंदोलन करणे, हा सर्वांना संविधानाने दिलेला अधिकार आहे. मात्र, सरकारच्या दृष्टीने सर्व समाज सारखेच असले पाहिजे. सरकारने त्यात भेदभाव करता कामा नये. एका समाजाच्या आंदोलकांसमोर लाल गाडीचे पसरायचे आणि दुसऱ्या घटकांना वाऱ्यावर सोडायचे, असे केले जाऊ नये, असेही वडेट्टीवार यांनी सरकारला सुनावले.

# कास पठार गर्दीने फुल्ल

## पर्यटक घेताहेत निसर्ग भ्रमंतीचा आनंद

**सातारा :** कास पठार परिसरात पावसाळी पर्यटन आता बहरू लागले असून कास तलाव परिसरात पर्यटकांची मोठ्या प्रमाणावर गर्दी झाली होती. शनिवार, रविवार व बकरी ईद अशा सलग सुट्ट्या जोडून आल्याने कासचे पर्यटन मोठ्या प्रमाणावर वाढले आहे. उत्तेश्वर घाटापासून कास पठार, कास तलावापर्यंत पर्यटकांच्या वाहनांची गर्दी दिसून आली. कास, बामणोली परिसरात अधून मधून रिमझिम पडणारा पाऊस यामुळे संपूर्ण परिसर हिरवागार झाला असून काही





ठिकाणी थोड्याफार प्रमाणात ओढे व झरे वाहू लागले आहेत. कास पुष्प पठार, कास तलाव या परिसरात देखील अधून मधून पडणारा पाऊस व दाट धुके यामुळे या परिसरातील वातावरण अल्हाददायक बनले आहे. सुट्टीचा आनंद निसर्ग अनुभवून पर्यटकांनी घेतला.

**निसर्ग सौंदर्याचा मनमुराद आनंद**

आता कुठे पावसाची चाहूल लागली असून, पर्यटकांची पावले आता कास, बामणोली परिसराकडे वळू लागली आहेत. कोयना धरण शिवसागर जलाशयाची पाणी पातळी खालावल्याने बोटिंग व्यवसाय पूर्णपणे ठप्प झाला आहे. मात्र, या परिसरामध्ये फिरायला जाणारे पर्यटक हे निसर्ग सौंदर्याचा मनमुराद आनंद लुटत आहेत. फोटोग्राफीही अनेकजण करत आहेत. अनेक पर्यटकांनी कास व परिसरातील निसर्गाची भ्रमंती केली. तेथील विविध प्रकारच्या झाडांचेही अवलोकन केले. कासपठार फुलल्यानंतर पर्यटकांची गर्दी आणखी वाढण्याचा अंदाज व्यक्त केला जात आहे.

# बुवाबाजी करून राजकारणाला बट्टा लावणाऱ्या पटोलेंनी राजीनामा द्यावा!

## भाजपा शहराध्यक्ष शंकर जगताप यांची मागणी

**पिंपरी :** अनेक निवडणुकांमधील सततच्या पराभवानंतर लोकसभा निवडणुकीत दिसलेला आशेचा एक किरण काँग्रेसमधील सरंजामशाहीला नवसंजीवनी देणारा ठरला असून, गांधी घराण्यातील नेतापूजनाची परंपरा पटोले पूजनापर्यंत पोहोचल्याचे आता पहावयास मिळत आहे. पराजयातही विजयाच्या उन्मादाने उन्मत्त झालेले काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी चक्क कार्यकर्त्याकरवी पाद्यपूजा करून घेतल्याचा धक्कादायक प्रकार पुरोगामी महाराष्ट्राच्या राजकीय परंपरेला काळीमा फासणारा असून याचे जाहीर प्रदर्शन करणाऱ्या नाना पटोलेंनी ताबडतोब पदाचा राजीनामा देऊन राजकारणातून संन्यास घ्यावा, अशी मागणी भाजपाचे पिंपरी चिंचवड शहर ( जिल्हा) अध्यक्ष शंकर जगताप यांनी एका प्रसिद्धी पत्रकाद्वारे केली आहे.

देशाच्या राजकारणात काँग्रेसने व्यक्तिपूजेची परंपरा सुरू केली. गांधी घराण्याचे हुजरे यामध्ये आघाडीवर राहिले. याच परंपरेचा शिरकाव काँग्रेसमध्ये तळागाळात पोहोचला असून काँग्रेस प्रदेशाध्यक्ष आमदार नाना पटोले यांचे चिखलाने माखलेले पाय चक्क कार्यकर्त्यांनी पाण्याने धुतल्याचा प्रकार अकोला जिल्ह्यातील वाडेगाव येथे समोर आला आहे. अनेक निवडणुकांत सातत्याने होणाऱ्या पराभवानंतर काही जागांवर मिळालेल्या यशामुळे हुरळून गेलेल्या पटोले यांच्या अशा सरंजामशाहीला महाराष्ट्राच्या राजकारणात थारा दिला जाणार नाही, असेही शंकर जगताप यांनी या पत्रकात म्हटले आहे.

पुरोगामी महाराष्ट्राच्या राजकीय परंपरेस बट्टा लावणाऱ्या या कृतीबद्दल प्रायश्चित्त म्हणून पटोले यांनी राजकीय संन्यास घेऊन बुवाबाजी सुरू करावी व काँग्रेस प्रदेशाध्यक्षपदावर पाणी सोडावे, अन्यथा त्यांच्या विरोधात तीव्र आंदोलन उभारू असा इशाराही शंकर जगताप यांनी या पत्रकाद्वारे दिला आहे.

# नारायणगाव परिसरात वृक्षारोपण कार्यक्रम



## वृक्ष संगोपनाचा केला संकल्प

**नारायणगाव :** नारायणगाव पोलीस स्टेशन परिसरात नुकतेच वृक्षारोपण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले यावेळी संयोजकांनी वृक्ष संगोपनाचा संकल्प केला.

पोलीस नाईक मंगेश लोखंडे यांच्या वाढदिवसाचा खर्च टाळून पर्यावरण पूरक वृक्षांची लागवड नारायणगाव पोलीस स्थानकाच्या परिसरात करून त्यांचे पाच वर्षे संगोपन करण्याचा अनोखा संकल्प यावेळी करण्यात आला आहे. सहाय्यक पोलीस निरीक्षक महादेव शेलार व पोलीस पाटील सुशांत भुजबळ यांच्या संकल्पनेतून या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. यावेळी नारायणगाव पोलीस स्टेशनचे पोलीस उपनिरीक्षक सनील धनवे, विनोद धुर्वे, जगदीश पाटील, आदित्य डेरे, शंतनु डेरे , युवराज जवळेकर, सुशील ढवळे, अविनाश डावखर पोलीस अंमलदार दत्ता ढेंबरे, सचिन सातपुते, शैलेश वाघमारे, सोमनाथ डोके, सत्यम केळकर, गोकुळ कोळी, होमगार्ड काळे , नारायणगाव पोलीस स्टेशन हद्दीतील पोलीस पाटील, महिला कॉन्स्टेबल सुवर्णा गडगे, गारगोटे, दरवडे, होळकर उपस्थित होत्या.

वृक्षारोपण करण्यासाठी वनपरिक्षेत्र अधिकारी प्रदीप चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली वनपाल अनिता होले, वनरक्षक ज्ञानेश्वर पवार, वन कर्मचारी खंडू भुजबळ यांनी कळंब वर्पे मळा या ठिकाणावरून रोपे आणून देण्यास मदत केली आहे.

# सिद्धेश्वर विद्यालयात तब्बल १९ वर्षांनी भरला दहावीचा वर्ग

**देऊळगाव राजे :** सिद्धेश्वर माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात सन २००५ साली इयत्ता दहावी ला असणाऱ्या विद्यार्थ्यांनी तब्बल एकोणीस वर्षांनी स्नेहसंमेलन आयोजित केले होते, या कार्यक्रमास बॅच च्या विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्तपणे प्रतिसाद दिला,मान्यवरांच्या हस्ते दीपप्रज्वलन करून कार्यक्रमास सुरुवात झाली, यावेळी संस्थेचे सचिव हरिभाऊ ठोंबरे, माजी मुख्याध्यापक आदिनाथ थोरात,सर्व विषयांचे शिक्षक,शिक्षकेतर कर्मचारी व मोठ्या संख्येने विद्यार्थी उपस्थित होते, तब्बल एकोणिसाव्या वर्षी देखील एकूण ८२ विद्यार्थी सहभागी झाले होते, यावेळी विद्यार्थ्यांच्या वतीने शाळेसाठी



दहा पंखे भेट देण्यात आले,सर्वांचा स्वागत समारंभ झाल्यावर उपस्थित विद्यार्थ्यांनी परिचय करून देताना सध्या आपण कोणत्या क्षेत्रात कार्यरत आहोत याविषयी मनोगत व्यक्त केले, यामध्ये कुणी शेतकरी, प्रशासकीय सेवेत,शेअर मार्केट,खाजगी नोकरीत, कुणी स्वतःच्या व्यवसायात उत्तुंग भरारी घेतलेली तर कुणी इंडियन आर्मी मध्ये देशाची सेवा करत आहेत, तर कुणी उत्तम प्रकारे गृहिणी असल्याचे सांगितले ही सर्व प्रगती बघून उपस्थित शिक्षकांनी सर्वांचे भरभरून कौतुक केले, दरवर्षी काही तरी सामाजिक उपक्रम बॅच च्या वतीने राबविण्याचे ठरले,कार्यक्रमामध्ये ज्या सहकारी मित्रांचे दुःखद निधन झाले त्यांना भावपूर्ण श्रद्धांजली यावेळी अर्पण करण्यात आली व कार्यक्रम सुरू करण्यात आला,

विविध प्रकारचे खेळ,सर्वांची खुशाली,सर्वांचे मनोगत यामुळे सकाळी दहा वाजता सुरू झालेल्या कार्यक्रमाची सांगता संध्याकाळी सहा वाजता झाली,मैत्री म्हणजे एक अविस्मरणीय ठेवा असतो तो जपण्यासाठी असे कार्यक्रम वेळोवेळी होणे गरजेचे आहे असे मत सर्वांच्या मनोगतातून व्यक्त होत होते,कार्यक्रमाचे संयोजन करण्यासाठी दिनेश पवार, सागर जाधव यांनी पुढाकार घेतला होता,सर्वांनी पुन्हा एकदा आपल्या बेंचवर बसून जुन्या शालेय आठवणी जाग्या केल्या,गप्पा गोष्टी यात दिवसभर कार्यक्रम कधी झाला हे समजलेच नाही, कार्यक्रमाचे सूत्रसंचालन दिनेश पवार यांनी केले.

# नरेंद्र मोदींपेक्षा आमच्या सुप्रिया सुळेंना जास्त मते पडली: पवारांनी डिवचलं

**बारामती :** खासदार सुप्रिया सुळे या पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यापेक्षा जास्त मतांनी निवडून आल्या, असे विधान करत राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष शरद पवार थेट पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यावर निशाणा साधला आहे. बारामतीत आयोजित एका कार्यक्रमात ते बोलत होते.

लोकसभा निवडणुकीचे निकाल लागून जवळपास १५ दिवस उलटून गेल्यानंतर आज (२० जून) शरद पवार यांनी सुप्रिया सुळे यांच्या विजयावर भाष्य करत थेट पंतप्रधानांवरच निशाणा साधला आहे. देशाच्या पंतप्रधानांपेक्षा सुप्रिया सुळे जास्त मतांनी निवडून आल्या. पंतप्रधान दीड लाख मतांनी विजयी झाले. तर सुप्रिया सुळेंना एक लाख ५४ हजार मते पडली, असेही त्यांनी यावेळी सांगितले.

नुकत्याच झालेल्य लोकसभा निवडणुकीत बारामतीची लढाई ही सर्वात प्रतिष्ठेची लढाई ठरली. बारमतीच्या निकालाकडे संपूर्ण राज्याचे लक्ष लागले होते. बारामतीत सुप्रिया सुळे विरुद्ध महायुतीच्या सुनेत्रा पवार म्हणजे उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या पत्नी अशी लढत झाली. यांत बारामतीकरांनी सुप्रिया सुळे यांच्या पारड्यात मते टाकली.

शरद पवार म्हणाले, १९६७ साली मी नुकताच कॉलेज जीवनातून बाहेर आलो होतो. सोमेश्वर कारखान्याचे बाबूलाल काकडे यांच्या विरोधात निवडणूक लढलो आणि बारामतीकरांनी मला विजयी केले. बारामतीमधील तरुण पिढीने मला नेहमीच साथ दिली. सुप्रिया सुळे यांची २०२४ ची ही निवडणूक चौथी निवडणूक असतानाही त्यांना प्रचंड मतांनी विजयी केले. बारामतीत. जनतेला कोणते बटन दाबायचे हे सांगावे लागत नाही.

भाजप आणि मोदी सरकार यांच्याबद्दल लोकांच्या मनातील विश्वासाला तडा गेला आहे. मोदींच्या गॅरंटीवर आता लोकांना विश्वास राहिला नाही, असेच चित्र महाराष्ट्रात आणि देशात दिसत आहे. हेच यंदाच्या लोकसभा निवडणुकीतून स्पष्ट झाले. पंतप्रधान मोदींची गॅरंटी खोटी निघाली, अशा शब्दांत शरद पवारांनी मोदींवर टीकास्त्र डागले. लोकसभा निवडणुकीच्या निकालानंतर भाजपची महाराष्ट्रात भाजप मागे पडला. इतकेच नव्हे तर, भाजपला केंद्रातही स्वबळावर सत्ता मिळवता आली नाही. पण तरीही एनडीएचे सरकार स्थापन केले आहे. निकालानंतर राष्ट्रीय स्वयंसेवक संघानेही भाजपवर टिका केली.

जनतेचा आता मोदींवर आणि त्यांच्या सरकारवर विश्वास उरला नाही. मोदींनी जी आश्वासने दिली होती ती गेल्या ५-१० वर्षांत कधीही पाळली नाही, आता हे लोकांच्या लक्षात आले आहे. पण आता लोकांना बदल हवा आहे, त्यामुळे राज्यात हे चित्र बदलल्याचे शरद पवार यांनी यावेळी नमुद केले.

# हिंमत असेल तर उद्धव ठाकरेंना अडवून दाखवा : वैभव नाईकांचे खुले आव्हान

**कुडाळ :** भाजप आमदार नितेश राणेंनी अनेक वेळा चॅलेंज केले आहे. मात्र, उद्धव ठाकरे लवकरच विधानसभेचे रणशिंग फुंकणार आहेत आणि त्यावेळी ते कोकणात येतील तेव्हा हिंमत असेल तर त्यांना अडवून दाखवा, असे आव्हान शिवसेनेचे ठाकरे गटाचे आमदार वैभव नाईक यांनी दिले. कुडाळ येथे घेतलेल्या पत्रकार परिषदेत वैभव नाईक ते बोलत होते. यावेळी त्यांनी भाजप आणि लोकसभा निवडणुकीत झालेल्या अनेक घडामोडींवरही भाष्य केले आहे.

वैभव नाईक म्हणाले, लोकसभा निवडणुकीत आमचा झालेला पराभव आम्हाला मान्य आहे. मी विनायक राऊत यांची माफी मागितली, कारण एक शिवसैनिक म्हणून निवडणुकीच्या शेवटच्या दोन-तीन दिवसात राणेंच्या कार्यकर्त्यांकडून जो प्रकार मतदारसंघात चालू होता तो आम्ही रोखू शकलो नाही. त्यामुळे विनायक राऊत यांचा माफी मागितली.

नारायण राणेंच्या कार्यकर्त्यांनी लोकांच्या घराघरात जाऊन त्यांच्यावर दबाव आणला. या प्रकाराचे अनेक व्हीडिओ सुद्धा समोर आले आहेत. त्यामुळे या जिल्ह्यातील चार-चार मंत्री सरकारमध्ये असतानाही यांना लोकांवर का दबाव आणावा लागला ? याचे आत्मपरीक्षण त्यांनी करावे आणि लोकांची माफी मागावी, असे टोलाही नाईक यांनी लगावला.

लोकसभा निवडणुकीत राणेंनी पैसे वाटून ते निवडून आले असा आरोप संजय राऊत यांनी केला होता. त्याला प्रत्युत्तर देताना आमदार नितेश राणे यांनी कोकणातील जनतेची माफी मागितली नाही तर उद्धव ठाकरेंना कोकणात पाऊल ठेऊ देणार नाही, असा इशारा दिला होता. यालाही वैभव नाईक यांनी प्रत्युत्तर दिले.

लोकसभा निवडणुका आता होऊन गेलेल्या आहेत. त्यावेळी जी आश्वासने देण्यात आली होती, ती तशीच आहेत. त्यात नारायण राणे यांनी जर्मनीला २५ हजार युवकांना पाठविणार असे आश्वासन दिले होते. तर शिक्षण मंत्री दीपक केसरकर यांनी सांगितले होते की, शिक्षकांची सर्व पदे भरणार तरी अजून आज सुद्धा ५० टक्के शिक्षकांची पदे रिक्त आहेत. शालेय विद्यार्थ्यांना शाळा सुरू होऊन सुद्धा गणवेश साहित्य वाटप मिळालेले नाही.

आज पावसाळ्याने दडी मारली आहे. तरी कृषी अधिकार्यांना या संदर्भात कोणतेही उपाययोजना आखण्यासंदर्भात कोणतीही सूचना देण्यात आलेली नाही. त्यामुळे हे विरोधक केवळ राजकारण करण्यापुरते आहेत. त्यातून स्वार्थ पाहत आहेत, अशी टीका आमदार वैभव नाईक यांनी केली.

गेल्या दोन वर्षांमध्ये या राज्याला काय मिळाले याचा विचार खरेतर केला पाहिजे. शिवसेना फुटल्यानंतरही जनतेने आज उद्धव ठाकरे यांच्यावर विश्वास ठेवला, जनता त्यांच्याबरोबरच राहिली, असा विश्वास आमदार वैभव नाईक यांनी व्यक्त केला.